महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम,२००५ च्या अंमलबजावणीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शासन परिपत्रक क्र.विभशा-२०२१/प्र.क्र.१४/विजाभज-१(अ)**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग,**
**मंत्रालय विस्तार इमारत, पहिला मजला**
**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**
**दिनांक:-२१ जानेवारी, २०२१.**

**वाचा:-१.सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्रमांक-एसआरव्ही-२०००/प्र.क्र.(१७/२०००)/बारा, दिनांक २८ मार्च, २००५.**
**२.सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक-एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/बारा, दिनांक ०१ जुलै, २००५.**

**प्रस्तावना :-**

राज्य लोकसंख्या धोरणाच्या अंतर्गत शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्याच्या दृष्टीने दोनपेक्षा अधिक मुले असणाऱ्या उमेदवारांना शासन सेवेत नियुक्ती देण्यास प्रतिबंध करण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम,२००५ हे वाचा येथील क्र.१ च्या अधिसूचनेद्वारे नियम अंमलात आले आहेत. सदर नियम अंमलात येणाऱ्या दिनांकास दोनपेक्षा अधिक मुले असणाऱ्या व्यक्तीस, अंमलबजावणीच्या दिनांकास असलेल्या तिच्या मुलांच्या संख्येत जोपर्यंत वाढ होत नाही तोपर्यंत नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यात येणार नाही. तसेच सदर अधिसूचनेद्वारे शासन सेवेतील गट 'अ' ते 'ड' मधील सर्व पदांवर सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यांसाठी अधिसूचनेत विहीत केलेली 'लहान कुटुंबाची' अतिरिक्त अट लागू झालेली आहे. यास्तव शासकीय सेवेत नोकरभरती करताना सदर नियमांचे काटेकोरपणे पालन करुन जाहिरातीमध्ये आवश्यक ती अट नमूद केली जाईल आणि सदर नियमानुसार सर्व उमेदवाराकडून प्रतिज्ञापन घेण्याबाबत वाचा येथील क्र.२ अन्वये निर्देश देण्यात आलेले आहे.

राज्यातील शासन मान्यताप्राप्त स्वयंसेवी संस्थामार्फत विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळा/विद्यानिकेतन व ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठीच्या आश्रमशाळा चालविल्या जातात. सदर आश्रमशाळांना शासनाकडून अनुदान देण्यात येते. तसेच सदर आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदभरती शासनाच्या विहीत केलेल्या नियमानुसार तसेच शासनाच्या मान्यतेने करणे आवश्यक आहे. त्यानुसार विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळा/विद्यानिकेतन व ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठीच्या आश्रमशाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पदभरतीबाबत विहीत केलेले सर्व नियम लागू होतात. त्यामळे विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळांमधील कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम.२००५ हे आपोआपच लागू होतात. तरी सदर नियम विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळा चालविणाऱ्या संस्था तसेच क्षेत्रिय कार्यालयाच्या निदर्शनास आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक:-**

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम,२००५ हे नियम विजाभज प्रवर्गाच्या सर्व आश्रमशाळांना लागू आहेत. त्यामुळे सदर नियमातील तरतुदीनुसार विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळांमध्ये सन २००५ पुर्वी व सन २००५ नंतर नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यास दि.२८ मार्च,२००५ व त्यानंतर दोनपेक्षा जास्त अपत्य झाले असल्यास अशा सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांबाबतची माहिती संबंधित संस्था/आश्रमशाळांकडून प्राप्त करुन घ्यावी. तसेच विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळेत सध्या कार्यरत असलेल सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकडून वाचा येथील क्र.१ च्या अधिसूचनेमधील नियम क्र.४ मध्ये नमूद केल्यानुसार 'प्रतिज्ञापन' प्राप्त करुन घ्यावे. दि.२८ मार्च,२००५ व त्यानंतर जर काही शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दोनपेक्षा जास्त अपत्य झाले असल्यास अशा सर्व कर्मचाऱ्यांविरुध्द वाचा येथील क्र.१ च्या अधिसूचनेमधील नियम क्र.३ नुसार त्वरीत अनर्ह (Disqualify for appointment) ठरविण्याची कार्यवाही करावी. आवश्यकता असल्यास याबाबतचे प्रस्ताव योग्य निर्णयासाठी शासनास सादर करावे. सदरची कार्यवाही ३० दिवसात पूर्ण करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

२. यापुढे आश्रमशाळांमधील पदभरती करताना जाहिरातीमध्ये 'लहान कुटुंबाची' अट नमूद करणे बंधनकारक राहील. तसेच पदभरती केलेल्या कर्मचाऱ्याकडून 'लहान कुटुंबाचे' प्रतिज्ञापन घेणे, ही संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याची जबाबदारी राहील. प्रादेशिक स्तरावरुन विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळांमधील कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मान्यता देताना संबंधित कर्मचाऱ्याने 'लहान कुटुंबाचे' प्रतिज्ञापन सादर केले आहे अथवा नाही याबाबतचा स्पष्ट उल्लेख वैयक्तिक मान्यता आदेशामध्ये नमूद करणे आवश्यक राहील. अन्यथा सदरचे वैयक्तिक मान्यता आदेश ग्राह्य समजण्यात येणार नाही.

३. विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळांमधील कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक मान्यता, समाजसेवार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ट करण्याबाबतचे प्रस्ताव सक्षम प्राधिकारी/शासनास सादर करताना सदर प्रस्तावासोबत संबंधित कर्मचाऱ्याचे 'लहान कुटुंबाचे' प्रतिज्ञापन जोडले आहे का, याबाबतची खातरजमा करण्यात यावी. अन्यथा सदरचे प्रस्ताव शासनास सादर करु नये. याचीपण नोंद घ्यावी.

४. सामान्य प्रशान विभागाने महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम,२००५ बाबत वेळोवेळी निर्गमित केलेले सर्व शासन निर्णय/परिपत्रके/आदेश/पत्र इत्यादी विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळांमधील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लागू राहतील. त्या आदेशाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी.

५. सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्रमांक-एसआरव्ही-२०००/प्र.क्र.(१७/२०००)/बारा, दि. २८ मार्च, २००५ ची प्रत सदर परिपत्रकासोबत जोडण्यात आलेली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(मं.हिं.बनसोडे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा. मंत्री (इतर मागास बहुजन कल्याण) यांचे खाजगी सचिव

२. मा. राज्यमंत्री (इतर मागास बहुजन कल्याण) यांचे खाजगी सचिव